PUNE RESEARCH SCHOLAR ISSN 2455-314X
AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY JOURNAL VOL 4, ISSUE 1

# यादवकालीन महाराष्ट्र व महानुभाव पंथ

**संध्या रुस्तुम येवले**
टिळक महाराष्ट्र विद्यापीठ
**पुणे. महाराष्ट्र भारत**

**प्रस्तावना :–**

तेराव्या शतकात महाराष्ट्र यादवांच्या राजवटीखाली स्वराज्याचे सुख अनुभवीत होता. हे राजघराणे सनातन धर्माभिमानी असून हेमाद्रीच्या धर्मपंडिताच्या मार्गदर्शनाने चालणारे होते. इस्लामचे आक्रमण अजून दक्षिणपर्यंत पोचले नव्हते व त्या दृष्टीने हिंदू धर्माची ध्वजा मानाने डोलत होती हे खरे; पण तो हिंदू धर्म आतून खिळखिळा झाला होता. यादव राजे वैदिक संस्कृतीचे अभिमानी आणि विद्या व कला यांचे भोक्ते होते. ज्योतिष संगीत वेदान्त धर्मशास्त्र, व्याकरणशास्त्र इत्यादीवर संस्कृती भाषेत विविध ग्रंथरचना होत होती. भास्कराचार्य लक्ष्मीधर चांगदेव यांच्यासारखे विद्वान ज्योतिषी संगीत रत्नाकरकार शारंगधर, बोपदेव आणि हेमाद्री यांसारखे महापंडित याच कालखंडातले विद्वता आणि संस्कृत ग्रंथनिर्मिती यांमुळे राजदरबारी त्यांचा दबदबा होता. तथापि सांस्कृतिक दृष्ट्या समाजातील उच्च पातळीवर असलेली समृध्दी जनसाधारणाच्या दृष्टीने नगण्य होती. स्वाभाविक पणे यादव काळातील हवा सांस्कृतिक जीवनात संस्कृत भाषेचाच प्रामुख्याने पुरस्कार होत होता. त्यामुळे लोकभाषेतून लोकजीवनाला सुसंस्कृत करणारी परंपरा अजून रुजलेली नव्हती.

तत्कालीन लोकजीवन धर्मसंबध्द होते. राजाश्रय असलेल्या वैदिक धर्मात द्वैत – अद्वैत, ज्ञानयोग – कर्मयोग, स्मार्त – भागवत अशा विभिन्न मतप्रणाली आपापल्या मतांचा पुरस्कार अभिनिवेशाने करीत होत्या. उच्चवर्गात देवी प्रीत्यर्थ केलेली हजारोव्रते, उपवास, तीर्थयात्रा,

कर्मकांडातच गुरफटून जाण्याची प्रवृत्ती वाढत चालली होती. अशा परिस्थितीत जैन, नाथ, लिंगायत या धर्मसंप्रदायांनी पारमार्थिक दृष्ट्या सर्वसमावेशक पातळीवरुन प्रचारकार्य चालू ठेवला असता. सामान्य जनतेला त्याच्या विषयी आकर्षन वाटू लागल्यास नवल नव्हते.

याच पार्श्वभूमीवर याच काळात म्हणणे शालिवाहन शकाच्या बाराव्या शतकाच्या उत्तरार्धात मराठी भाषेला ज्ञानभाषेचे स्थान देणारा. ज्ञान आणि भक्तीची सांगड घालून एकेश्वरी भक्तीचा पुरस्कार करणारा सामाजिक विषमता नाकारुन सर्वांनाचा मोक्षाचा अधिकार देणारा महानुभाव संप्रदाय उदयाला आला. पंथाचे संस्थापक श्री चक्रधरस्वामी यांचे शके 1142 मध्ये महाराष्ट्रात आगमन झाले आणि त्यांनी रिध्दपूर येथे जाऊन महानुभावांचे चतुर्थकृष्ण श्रीगोविंदप्रभू यांचे दर्शन घेतले. त्यांच्याकडून त्यांनी पारावर शक्तीचा स्वीकार केला होता आणि तेव्हापासून महानुभावपंथ उदयास आला. परमार्ग परमेश्वराचे ज्ञान देणारा मार्ग. त्यानंतरच्या काळात महात्मापंथ, अच्युतपंथ, अहंमार्ग जयकृष्णपंथ म्हणूनही हा संप्रदाय ओळखला जाऊ लागला. पंजाब मध्ये जयकृष्णीपंथ म्हणून आणि महाराष्ट्रात महानुभाव पंथ म्हणून आज ही संप्रदाय ओळखला जातो.

**व्याख्या :—**

1द्ध **इतिहासाचार्य राजवाडे :—** यांच्या मत 'इसवी सनाच्या तेराव्या शतकाच्या उत्तरार्धात परमार्थाच्या नावावर ऐहिक उपभोगांवरच महाराष्ट्रीयांनी आपले लक्ष केंद्रीत केले होते. तेराच्या शतकातील सर्वात श्रेष्ठ मानला गेलेला गचतुर्वग चिंतामणी' हा होय. या ग्रंथात प्रत्येक दिवसाला आणि प्रत्येक तिथीला दहा—दहा पाच—पाच व्रतांचा निर्देश असून प्रत्येक व्रतासाठी कोणत्या देवतेसाठी कोणते पक्वान्न केले पाहिजे याविषयीचा निर्णय दिलेला आहे. या व्रतखंडात 365 दिवसांसाठी जवळजवळ दोन हजार व्रत सांगितलेली आहेत.'

2द्व **वि.भि.कोलते** :— 'श्री चक्रधरांच्या तत्वज्ञानामुळे वैदिक संप्रदाय अद्वैतसिध्दांत, चातुर्वण्य व्यवस्था, सामाजिक विषमता, व्रतदानादी आचार, वेदपुराणादी शास्त्राचे महत्व कमी व्हायला लागले होते. '

**सर्वसमावेशक व्याख्या :—**

**आभ्यासाची उद्दिष्ट्ये आणि पध्दती :—**

प्रस्तूत शोधनिबंधातून वर्णनात्मक संशोधन पध्दतीचा उपयोग करण्यात आलेला आहे. यादव कालखंडातील महाराष्ट्रातील परिस्थिती व त्यातून महानुभाव पंथाचा उदय व विस्तार याचा अभ्यास करणे ही उद्दिष्टे होत.

**यादवकालीन महाराष्ट्र :—**

तेराव्या शतकात महाराष्ट्र यादवांच्या राजवटीखाली होता. हे राजघराणे सनातन धर्माभिमानी असून हेमाद्रीसारखा धर्मपंडितांच्या मार्गदर्शनाने चालणारे होते. इस्लामचे आक्रमण अजून दक्षिणेपर्यंत पोहचले व त्या दृष्टीने हिंदूधर्माची ध्वजा मानाने डोलत होती. पण हिंदूधर्म आतून खिळखिळा झाला होता. शंकराचार्यांनी अद्वैतमार्गाची प्रस्थापना करुन वैदिक धर्माची संघटना केल्याला तीन चार शतके उलटून गेली होती व सहाजिकच त्यांच्या कार्याचा विसर पडून तो धर्म आणि ती संघटना विस्कळित होत गेली. स्वराज्यामुळे स्वधर्म टिकून होता. पण त्यातील तेज नष्ट झाले होते. विविध प्रकारची देवदैवते, व्रतवैकल्य, मंत्र तंत्र यांचा अतिरेक होऊन सर्वत्र सकाम भक्तीचे बंड माजले होते असे दिसून येते. धर्माच्या अंतरंगाचा विसर पडून त्यांच्या बाह्यांगावर सर्वांची दृष्टी खिळून राहिली होती. त्यातच जैन व वीरशैव यांसारखे अवैदिक धर्मपंथ सनातन धर्मातील चातुर्वर्ण्याच्या कल्पनेवर आघात करुन त्याला उघडपणे विरोध करीत होते. सारांश शंकराचार्यांनी पुनःस्थापित केलेला सनातन वैदिकधर्म अंतर्बाह्य संकटात होता.

तत्कालीन तत्वप्रणालीचा विचार करता तेव्हा वैष्णव नाथ व भागवत असे तीन ग्रंथ दिसून येतात. यापैकी रामानुजीय वैष्णवपंथ द्वैतभक्तीच्या पायावर उभा असून त्यात कर्मटपणाचा अतिरेक झाला होता. दुसरा नाथपंथ हा उदार विचारचरसरणीचा सार्थकता पंथ असून तो आत्मानुप्रधान होता. ज्ञानेश्वर आपल्या भावंडासह या नाथपंथातच समाविष्ट झाले होते. तिसरा भगवत धर्म याने पंढपूरचा वारकरी संप्रदाय होय. हा संपद्राय पुरातन आहे. 'नाथ पंथीय गहिनीनाथांनी महाराष्ट्रात नाथपंथाचा व वारकरीसंप्रदायाचा समन्वय केला असे म.रा.जोशी यांनी म्हटले आहे. ज्ञानेश्वरांनी भगवंताची नांदी मेळवून तो पंथ सुसंघटित केला व ज्ञानेश्वरीसारख्या ग्रंथाची रचना करुन त्याला तंत्रज्ञानाची बैठक प्राप्त करुन दिली. भागवत संप्रदाय असा त्यापूर्वीच भागवत संप्रदाय असा त्यापूर्वीच होता. त्याला ज्ञानेश्वरीने बैठक प्राप्त करुन दिली. हा अद्वैतभक्तीचा संप्रदाय असून तो व्यवहार चातुकर्म पाळीत असला तरी भक्तीत तो कोणतेही भेदाभेद मानीत नाही. या संप्रदायाला यादवांच्या राजघराण्याचा पाठिंबा असावा असे पंढरपूरच्या चौऱ्याऐंशी च्या लेखात रामचंद्रदेव यादवाच्या नावामागे पांडरीफडमुख्य हे बिरुद लावले आहे. त्यावरुन वाटते या काळात मराठी भाषेचा कैवार घेणारा व अवतारावाद मानून भक्तीचे पण द्वैती तत्वज्ञान सांगणारा एक नवीन संप्रदाय महाराष्ट्रात उदयाला आला त्याचे नाव 'महानुभाव पंथ' असे आहे. या पंथाचे संस्थापक श्री चक्रधर यांचे चरित्र कथन करणारा लीळाचरित्र (1278) हा मराठीतील उपलब्ध असा पहिला ग्रंथ मानला जातो. त्यानंतर दुसरा महत्वाचा नाथपंथीय श्री ज्ञानदेव यांचा 'ज्ञानेश्वरी' (1290) या नावाने ओळखला जाणारा ग्रंथ होय. हे दोन्ही ग्रंथ यादव राजवटीच्या काळात निर्माण झाले.

**महानुभाव पंथ** :– हा एक हिंदूधर्मांतर्गत संप्रदाय असून तो महाराष्ट्रात उदयाला आलेला असला तरी एका काळी त्याचा प्रसार काबूल – कंदाहारा पर्यंत झालेला होता. परंतु अलीकडे पाकिस्तानच्या निर्मितीनंतर भारताच्या वायव्य सीमेवरील महानुभाव पंथियांच्या मठांचे अस्तित्व संपुष्टात आले व तेथील महानुभाव महंत पंजाबात येऊन स्थायिक झाले. सध्या या पंथाचे

अनुयायी मुख्यतः महाराष्ट्र. मध्यप्रदेश व पंजाब या तीन प्रांतात पसरलेले दिसतात. महाराष्ट्रात महानुभाव या नावाने प्रसिध्द असलेला हा पंथ दिल्ली पंजाबकडे जयकृष्णी पंथ म्हणून ओळखला जातो. त्याची स्थापना श्री चक्रधरस्वामींनी बाराव्या शतकाच्या उत्तरार्धात केली हे एक द्वैती तत्वज्ञान असून त्यानुसार जीव जगत व देवता यांपासून पूर्णपणे स्वतंत्र असणारा एक नित्यमुक्त परमेश्वरच मुक्ती देण्यास समर्थ आहे.

'सृष्टीमध्ये वाव्हणे करणे मुंचिजेबा एके परमेश्वरविंण' हा सिध्दांत म्हणणे या तत्वज्ञानाचा पायाच असल्यामुळे त्या परमेश्वराची भक्ती करुन त्याचे ज्ञान प्राप्त करुन घेणे या पंथाचे एकमेव साध्य आहे. महानुभाव मतानुसार हा परमेश्वर जीवांच्या उध्दारासाठी अवतार घेत असल्याने त्यात अवतारवात ओघानेच येतो. परमेश्वराचे असे पाच प्रमुख अवतार महानुभाव पंथ मानतो. ते म्हणणे 1) श्रीकृष्ण चक्रवर्ती, 2) श्री दत्तात्रेय प्रभू, 3) श्री चांगदेव, 4) गोविंद प्रभू, 5) श्री चक्रधर या पाच अवतारांना 'पंचकृष्ण' म्हणतात. त्यांची नावे दत्तभक्ती व कृष्णभक्ती यांचे मिलन सुचवतात. त्यामुळे महानुभाव पंथ हा जसा कृष्णसंप्रदाय तसाच दत्तसंप्रदायही ठरतो. मात्र हा दत्तसंप्रदाय नृसिंहसरस्वतीच्या दत्तसंप्रदायाहून अगदी भिन्न आहे. तसेच महानुभावांचा दत्त व श्रीकृष्ण हे अनुक्रमे ब्रम्हा–विष्णु– महेश व विष्णू या देवतांचे अवतार नसून ते प्रत्यक्ष परब्रम्ह परमेश्वराचे अवतार आहेत. महानुभाव मूर्तिजूनक असले तरी जे ज्या मूर्तीची पूजा करतात ती 'संबंधी' पाषाणाची म्हणजे परमेश्वराची अवतारांचा संबंध आलेल्या पाषाणाची असते. या पंथाने मराठी ही आपल्या धर्मभाषा मानल्याने त्यांच्या अनुयायांनी मराठी भाषेत प्रथमापासूनच विपुल ग्रंथनिर्मिती केली आहे. महानुभावांचे प्रारंभीचे ग्रंथ नेहमीच्या नागरी किंवा बाळबोध लिपीतच लिहिलेले होते. परंतु पुढे लौकरच काही कारणाने ते सांकेतिक लिपीत गेले व त्यामुळे पंथाबाहेरील लोकांना ते दुर्गम होऊन बसले. याचा परिणाम असा झाला की, महानुभावीय वाङ्मयाला प्राचीन व उज्वल अशी परंपरा असतानाही सर्वसामान्य वाचकांच्या दृष्टीने ते असून

नसल्याप्रमाणे झाले. एका प्रकारे अज्ञातवासात राहिले. परंतु अलीकडे, महानुभाव महंताच्या औदर्यामुळे व संशोधकांच्या परिश्रमामुळे त्याचा हा अज्ञातवास संपून ते उजेडात आले आहे.

**निष्कर्ष : —**

यादवकालीन महाराष्ट्रात यादवराजे......... वैदिक संस्कृतीचे अभिमानी आणि विद्या व कला यांचे भोक्ते होते. त्याकाळातील समाजव्यवस्था ही धर्मधिष्टित होती. त्यामुळे अंधश्रध्दा यज्ञ, कर्मकांड यांचे स्तोम माजले होते. या परिस्थितीत सगळ्यांना सहज भक्ती करता येणारा महानुभाव पंथ उदयास आला. या पंथाचे संस्थापक श्री चक्रधर स्वामी यांनी स्त्री—पुरुष समानता, पर्यावरणाचे संरक्षण याचा पुरस्कार केला. समाजातील जाती—भेदाला विरोध करुन सर्व जाती धर्मातील लोकांना महानुभाव संप्रदयात सामील करुन घेतले.

## संदभ ग्रंथ :—


1) महानुभवांचा इतिहास — मुरलीधर महानुभाव कोळपकर, श्रीनाथ प्रिंटींग प्रेस, 315 शनिवार पेठ, पुणे. इ.स. 1979

2) महानुभवांचे आचार धर्म — डॉ.वि.भि.कोलते, राहुल प्रकाशन, औरंगाबाद, तिसरी आवृत्ती, 31 डिसेंबर 2006.

3) महानुभाव पंथ आणि त्यांचे वाङ्‌मय — शं.गो.तुळपुळे, व्हीनस प्रकाशन.

4) संतसाहित्या — डॉ.अविनाश आलगावकर, महाराष्ट्र राज्या माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे, डिसेंबर 2011

5) लीला चरित्र — डॉ.वि.भि.कोलते, महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृति मंडळ, मंत्रालय, मुंबई, प्रथमावृत्ती, सप्टेंबर 1978

6) यादव कालीन महाराष्ट्र — सु.ग. पानसे, मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालय, मुंबई 1963

7) मराठी संताचे सामाजिक कार्य — वि.भि.कोलते, 1984